स्थापना - १९८३ नों. क्र. एफ. ८१४७/१९८३

# स्वाधार

## महिलांसाठी आधार केंद्र

केंद्रीय समाज कल्याण बोर्डाचे मान्यताप्राप्त कौटुंबिक सल्ला केंद्र

भेद सारे मावळू द्या वैर साऱ्या वासना
मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना

# वार्षिक अहवाल

एप्रिल २०१९ ते मार्च २०२०

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती' आरे रोड, गोरेगांव (प.), मुंबई - ४०० १०४.

Website : www.swadhar.com




CHRI MEETING



लिंगसमभाव कार्यशाळा
५-३-२०२०




विज्ञान शिबीर श्रीमती भालेराव



चांगला स्पर्श, वाईट स्पर्श -
वक्ते ॲड. संजय वाघमारे

# आमची स्फूर्तीस्थाने

## स्वाधारच्या संस्थापक अध्यक्षा



मा. मृणालताई गोरे



मा. प्रा. मीनाक्षीताई आपटे

यांच्या पदचिन्हांवरून चालण्याचा आम्ही प्रयत्न करतो.



१० वी पास - कौतुक



सावित्रीबाई फुले व्याख्यान



कविता स्पर्धा



सावित्रीबाई फुले व्याख्यान

# विनम्र श्रद्धांजली

मागील वर्षात काही मान्यवरांचे, कार्यकर्त्यांचे, हितचिंतकांचे आणि देणगीदारांचे दु:खद निधन झाले.

- ✦ भारताचे माजी राष्ट्रपती मा. श्री. प्रणव मुखर्जी (३१-०८-२०२०)
- ✦ माजी सनदी अधिकारी आणि महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या महिला निवडणूक आयुक्त श्रीमती नीला सत्यनारायण (१६-०७-२०२०)
- ✦ महिला चळवळीचा वैचारिक आधारस्तंभ, मार्गदर्शक प्रा. पुष्पा भावे (३-१०-२०२०)
- ✦ राज्य साहित्य पुरस्काराने सन्मानित साहित्यिक आणि अ.भि. गोरेगावकर शाळेतील जेष्ठ शिक्षिका श्रीमती वसुधा पाटील (३१-०५-२०२०)
- ✦ स्वाधारच्या कार्यकर्त्या श्रीमती अलका चाफेकर यांचे (३०-१०-२०१९)
- ✦ ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते व स्वाधारचे हितचिंतक श्री. मंहमद खडस (२१-११-२०१९)
- ✦ स्वाधारच्या चुनाभट्टी शाखेचे हितचिंतक व देणगीदार श्री. विल्यम वाझ (११-१२-२०१९)
- ✦ महिला चळवळीतील नेत्या व मिळून साऱ्याजणी मासिकाच्या निर्मात्या, संपादिका श्रीमती विद्या बाळ (३०-०१-२०२०)
- ✦ महिला चळवळीच्या कार्यकर्त्या श्रीमती मीना देवल (१२-०२-२०२०)
- ✦ स्वाधारचे हितचिंतक श्री. विनायक (बबलू) सामंत (२१-०३-२०२०)
- ✦ स्वाधारच्या चेंबूर शाखेच्या कार्यकर्त्या श्रीमती प्रतिभा नाडकर (१६-०४-२०२०)
- ✦ स्वाधारच्या चुन्नाभट्टी शाखेचे हितचिंतक व देणगीदार श्री. दत्तात्रय कुलकर्णी (०८-०५-२०२०)
- ✦ स्वाधार व राष्ट्र सेवा दल, गोरेगावच्या कार्यकर्त्या श्रीमती हेमा पेडणेकर (२३-०५-२०२०)
- ✦ स्वाधारच्या हितचिंतक व केशव गोरे ट्रस्टच्या कार्यकर्त्या श्रीमती पुष्पा चिटणीस (०१-०६-२०२०)
- ✦ ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते व केशव गोरे ट्रस्टचे माजी विश्वस्त श्री. मधुकर आडेलकर (१८-०६-२०२०)
- ✦ स्वाधारच्या गोरेगाव केंद्राच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती वंदना देशपांडे (३१-०८-२०२०).
- ✦ स्वाधारच्या मुलुंड शाखेच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती शारदा आशर (०६-११-२०२०).
- ✦ स्वाधारच्या मुंलुड शाखेच्या संस्थापक, संचालिका श्रीमती प्रभा देशमुख (०१-१२-२०२०)

या सर्वांना आणि याखेरीजच्या ज्ञात-अज्ञात हितचिंतकाना स्वाधारची विनम्र श्रद्धांजली.

## स्वाधारची ध्येय धोरणे :

१) शारीरिक व मानसिक त्रासाने पिडीत अशा महिलांना मदत करणे.

२) स्त्रियांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शैक्षणिक, वैद्यकीय, आर्थिक मदत करणे, कौटुंबिक सल्ला देणे आणि जरूर असेल त्याप्रमाणे कायदेशीर सल्ला देणे व कायदेशीर कारवाई करण्यास मदत करणे.

३) कौटुंबिक अत्याचाराला व हिंसेला बळी पडलेल्या स्त्रियांना आधार व संरक्षण देणे.

४) महिलांवर होणाऱ्या अत्याचाराबद्दल समाजात जाणीव व जागृती निर्माण करणे.

५) महिलांना त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणीव करून देणे, तसेच समाजातील एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव करून त्यांना जागृत व आत्मनिर्भर करणे. ह्या प्रकारचे कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्था यांच्याशी सहकार्य करून त्यांची मदत घेऊन या कामाची व्याप्ती वाढविणे.

## वार्षिक अहवाल - सन २०१९-२०२०

स्वाधारच्या संस्थापक व माजी अध्यक्ष मा. मृणालताई गोरे व मा. मीनाक्षीताई आपटे यांच्या स्मृतीस अभिवादन करून स्वाधार संस्थेचा एप्रिल २०१९ ते मार्च २०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल आम्ही आपल्यासमोर ठेवत आहेत.

भारतीय राज्य घटनेने सुरूवातीपासूनच धर्म, जात, वर्ण, लिंग इत्यदी वरून होणाऱ्या भेदभावास मनाई करून समानतेचे तत्व अंगिकारले. १९७५ पासून स्त्रीचळवळीने जोम धरला. स्त्रियांना आत्मभान आले त्या समक्ष बनू लागल्या. सर्व क्षेत्रात यशस्वीपणे वावरू लागल्या. पारंपरिक दृष्टया पुरूषांच्या मानलेल्या क्षेत्रामध्येही स्त्रियांनी कर्तृत्वाचा ठसा उमटविला. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये आरक्षणाच्या धोरणामुळे स्त्रिया राजकारणात सक्रीय झाल्या.

हे सगळे असले तरी ख-या अर्थाने सक्षम स्त्रियांची संख्या अत्यल्प म्हणावी अशीच आहे. एकूण स्त्रियांच्या तुलनेत त्यांची टक्केवारी काळजी वाटावी अशीच आहे. स्त्री शिक्षणाचा प्रश्न आहे. स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातील हिंसकपणा वाढत आहे. केवळ स्त्रियांसमोरच नाहीत तर एकूणच समाजात प्रत्येक घटकासमोर प्रश्न आहेत. व्यक्तिच्या खाजगी जीवनावरही अंकुश येऊ पहातोय हे आणि असे सर्व प्रश्न आणि त्या प्रश्नांबाबत प्रबोधनात्मक कार्यक्रम समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने आम्हाला महत्वाचे वाटतात.

या दृष्टीने काम करणे आणि सर्व जाती, धर्म, वर्णाच्या स्त्रियांना सक्षम बनिवण्यासाइी, त्यांची स्वप्रतिमा उंचावण्यासाठी मदत करणे. हे स्वाधारचे मुख्य उद्दिष्ट आहे. स्त्रियांना त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सहाय्य करण्यासाठी स्वाधार कुटुंब सल्ला केंद्र चालविते. त्याचबरोबर भविष्यात समस्या उभ्या राहू नयेत, स्त्रियांचा आत्मविश्वास वाढावा, स्त्रियांना समाजात सन्मानाचे स्थान मिळावे, समाजात लिंगसमभाव रुजावा. या दृष्टीने स्वाधार सातत्याने प्रबोधनात्मक व जनजागृतीचे कार्यक्रम राबविते. यात विविध वयोगटातील स्त्री-पुरूष, युवक-युवती व मुलांसाठी शिबिरे, कार्यशाळा, व्याख्याने इत्यादींचा समावेश असतो.

स्वाधारची उद्दिष्टे, ध्येय, धोरणे व कार्य लक्षात घेऊन केंद्रीय समाज कल्याण बोर्डाने १९८७ मध्ये स्वाधारला अधिकृत कौटुंबिक सल्ला केंद्र म्हणून मान्यता दिली व वार्षिक अनुदान मंजूर केले आहे.

स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त स्त्रियांच्या सोयीसाठी मुंबईत १९८८ मध्ये चेंबूर येथे, १९९१ मध्ये मुलुंड येथे व २०१७ पासून चुनाभट्टी येथे स्वाधारच्या शाखा सुरू करण्यात आल्या.

तसेच पुणे येथे १९९५ पासून स्वतंत्र केंद्र कार्यरत आहे.

# अध्यक्षांचे मनोगत

स्वाधार संस्थेचा एप्रिल २०१९ ते सप्टेंबर २०२० चा ३७ वा वार्षिक अहवाल संस्थेच्या संस्थापक मा. मृणालताई व मा. मीनाक्षीताई यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करून आपल्यासमोर ठेवत आहे. त्यांनी घालून दिलेल्या विचारांच्या व उद्दिष्टांच्या बळावरच आजवर आम्ही काम करत आहोत व करत राहू.

आज जरी स्त्रियांची अनेक क्षेत्रात उत्तम प्रगती झालेली असली तरी आजही समाजात, कुटुंबात लैंगिक अत्याचार, छेडाछेडी, सासरचा छळ, नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध हे सर्व प्रकार चालूच आहेत. त्यामुळे स्वाधारचे मुख्य कार्य म्हणजे कुटुंब सल्ला केंद्र. वर्षाला आमच्याकडे १५० वर केसेस येतात. त्यांना आमची सोशल वर्कर अतिशय चांगल्या तऱ्हेने त्यांना न्याय मिळवून देते. वेळ पडली तर आम्ही पोलीसांची मदतपण त्यांना मिळवून देतो. आमच्या स्वाधारच्या वकील आहेत त्या त्यांना न्याय हक्कासाठी मदत करतात.

आमचे मार्च पर्यंतचे कार्यक्रम झाले. त्यानंतर आपणास माहित आहे की, करोना वायरसच्या संसर्ग महामारीने सा-या जगाला ग्रासून टाकले. सोशल डिस्टसिंगद्वारे या महामारीला जास्तीस जास्त रोखता येईल यामुळे भारत सरकार व सर्व राज्यसरकारांनी पूर्णतः लॉकडाऊनची घोषणा केली. तो दिवस होता २३ मार्च, २०२०. सर्व सरकारी, खाजगी कार्यालय, बस- रेल्वे सेवा बंद करण्यात आल्या. शाळा- कॉलेज ही बंद झाली त्यामुळे केशव गोरे स्मारक ट्रस्ट व स्वाधार बंद झाले. त्यावेळी अध्यक्ष या नात्याने आमच्या समुपदेशकाला सांगितले की, तू आपला स्वाधारचा मोबाईल फोन घरी घेऊन जा, कारण घरुन काम करावे.

करोनाच्या काळात संस्थेची काही कामे आम्ही घरूनच फोनवरून काम करत होतो. दत्तक पालकांचे फोन नंबर होते. त्यांना जुलै महिन्यात दत्तक पालक योजनेच्या समिती सदस्यानी फोन केले. देणगी चेकद्वारे न देता स्वाधार बँक अकाऊंटमध्ये जमा करावी असे सांगितले. बँकेचे डिटेल्स त्यांनी सर्वांना कळवले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला त्याबद्दल मी सर्व दत्तक पालकांचे मनः पूर्वक आभार मानते. असेच सहकार्य आपल्याकडून मिळत रहावे अशी अपेक्षा करते.

२८ जुलै २०२० रोजी दहावीचा रिझल्ट लागला. आपल्या दत्तक पालक योजनेतील ३३ मुली व बालरंगाचे ४ मुलगे व ३ मुली असे एकूण ४० जण होते. निकाल अतिशय उत्तम लागला. म्हणजे १०० टक्के लागला. सर्वजण चांगल्या मार्कांनी पास झाले.

उत्तीर्ण विद्यार्थ्यांमधील ज्यंनी ८५% पेक्षा जास्त मार्क मिळविले अशा ६ विद्यार्थ्यांचे मी अध्यक्ष या नात्याने स्वतः फोन करुन स्वाधारतर्फे त्यांचे अभिनंदन केले त्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

दिनांक २१ जून, २०२० ला आम्ही नवीन माध्यमांच्या मार्फत ऑनलाईन मिटींग प्रथमच घेतली. मिटींग सुरू करण्यापूर्वी या मधल्या काळात म्हणजे दोन-अडीच महिन्यात गोरेगावमधील अनेक आपल्या परिचयाचे, जे मृणालताई व बाबुराव सामंतांचे निकटवर्ती होते तसेच ते स्वाधारला मानणारे होते. तसेच आमच्या काही कार्यकर्त्या भगिनींचे दुःखद निधन झाले. पण आम्ही कोणीही करोनाच्या विळख्यात अडकल्यामुळे त्यांच्या अंत्यदर्शनास जाऊ शकलो नाही त्याचे खूप वाईट वाटले. ह्या सर्वांना आदरांजली वाहिली. त्या सर्वांची नावे आदरांजली ह्या सदरात अहवालात नमूद केली आहेत. आम्ही १० ऑगस्ट, २०२० ला स्वाधार चालू केले. त्या आधी स्टाफला विचारले की, तुम्ही येऊ शकाल का ? त्या तिघींनी होकार दिला. त्याप्रमाणे संस्थेची अध्यक्ष या नात्याने मी समाज कल्याण केंद्रांचे अधिकारी श्री. डंगावकर यांना फोन करून सांगितले की, आम्ही स्वाधार चालू करत आहोत. त्याची वेळ ११ ते ३ राहील ते एक दिवसाआड सुरू राहील व करोनाचा जास्त प्रादुर्भाव झाला तर बंद करू. याला आपली संमती असेल तर आम्ही चालू करू. ते म्हणाले, हरकत नाही. त्याप्रमाणे मला मेल करा किंवा एक पत्र पाठवा व बोर्ड लावा. त्याप्रमाणे चालू केले. स्टाफला आम्ही सुरक्षिततेच्या दृष्टीने काही टिप्स दिल्या.

मागील वर्षाच्या म्हणजे २०१८ ते २०१९ अहवालात स्वाधारच्या अध्यक्षा यांनी मा. मृणालताईनी केलेल्या कार्याचा आणि संघर्षाचा दस्तऐवज तयार व्हावा आणि नवीन पिढीला त्याची ओळख करून देता यावी म्हणून केशव गोरे स्मारक ट्रस्ट मृणाल गोरे दालन करत आहोत. तेव्हा मी सर्व सभासद भगिनींना, दत्तक पालकांना, देणगीदार, हितचिंतक व गोरेगाव जायंट ग्रुपचे सर्व सभासद यांना अहवान केले होते की, त्यांनी दालनाच्या उभारणीच्या कामाला जरूर आर्थिक मदत करावी. त्याप्रमाणे आतापर्यंत आपण स्वाधार तर्फे ४ लाख २७ हजार तीन रूपये केशव गोरे स्मारक ट्रस्टला सुपूर्त केले आहेत. आपण सर्वांनीच मृणाल ताईंबद्दल प्रेम, आपुलकी व निष्ठा दाखवली त्याबद्दल सर्वांना धन्यवाद. आता पर्यंत दालन झाले असते पण करोनाच्या दृष्टचक्रामुळे काम बंद करावे लागले. आता काम चालू झाले आहे. अजूनही आपणा कोणास मदत पाठवायची असेल तर चेकवर केशव गोरे स्मारक ट्रस्ट असे लिहून स्वाधारच्या पत्रावर पाठवावी (पावती मिळेल).

केशव गोरे स्मारक ट्रस्ट बंधुत्वाच्या नात्याने स्वाधारच्या सर्व उपक्रमांना साथ देते. त्यासाठी मी ट्रस्टच्या सर्व विश्वस्ताचे व कर्मचा-यांचे मनः पूर्वक आभार मानते. तसेच आमचे दत्तक पालक, देणगीदार व हितचिंतक यांचेही आभार मानते. कारण स्वाधारचा डोलारा उभा आहे तो आपल्याच मदतीने. तसेच गोरेगाव जायंट ग्रुप आम्हाला मुला- मुलींच्या शैक्षणिक साहित्याची मदत करतात. ह्या वर्षीपण अजित शेठ याचा फोन आला होता पण शाळा करोनामुळे बंद असल्यामुळे तो कार्यक्रम आपण नंतर घेऊ असे सांगितले. त्यांचे ही आभार मानते. स्वाधारची समुपदेशक रोहिणी कुलकर्णी हिने लॉकडाऊन च्या काळात घरुन भ्रमणध्वनीच्या सहाय्याने केलेल्या कामाचे आपणा सर्वांतर्फेविशेष कौतुक !! तसेच माझ्या सर्व सहकारी व कार्यकर्त्या मनापासून साथ देतात त्यांचे कौतुक.

ह्यावेळचे अध्यक्षाचे मनोगत जरा जास्तच मोठे झाले आहे त्याबद्दल क्षमस्व.

**लता कारखानीस**
(अध्यक्षा, स्वाधार)

# लॉकडाऊनच्या काळात

कोविड १९ च्या साथीमुळे झालेल्या लॉकडाऊन च्या काळात अन्य कार्यालयांप्रमाणे स्वाधार चे केंद्र व शाखांची कार्यालयेही बंद ठेवण्यात आली. लॉकडाऊनमुळे कार्यालये बंद असली तरी स्वाधारचे कार्य बंद राहिले नाही.

या काळात स्वाधारच्या अध्यक्षा श्रीमती लता कारखानीस यांनी समुपदेशक श्रीमती रोहिणी कुलकर्णी यांना स्वाधारचा स्मार्ट फोन घरी नेऊन घरूनच काम करण्यास सांगितले. या लॉकडाऊनच्या काळात म्हणजे साधारण चार महिन्यांपेक्षा अधिक काळात एकूण ५२ समस्या (केसेस) स्वाधारच्या फोनवर आल्या. अशा सर्व समस्यांची नोंद करून घेतली. या सर्वांनी स्वाधारशी फोनद्वारे संपर्क साधलेला होता. त्यांना जी मदत व सल्ला दिला गेला त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

- महिलांची समस्या समजून घेतली त्यांना मानसिक, भावनिक आधार दिला.
- संबंधित व्यक्तींशी संवाद साधला, समुपदेशन केले.
- आवश्यकतेनुसार पोलिसांची मदत मिळवून दिली.
- कायदेविषयक सल्लाची गरज असलेल्या महिलांना ॲड. शुभदा पेठे यांच्या तर्फे मदत मिळवून दिली.

याच दरम्यान महाराष्ट्र राज्य समाज कल्याण बोर्डाच्या वेळोवेळी आलेल्या सूचनांनुसार लॉकडाऊनच्या काळातील (२४ मार्च २०२० ते ३० जून २०२० या कालावधीतील) ४० समस्यांचा तपशील व बोर्डाने मागितलेले अन्य तपशील अध्यक्ष श्रीमती लता कारखानीस, स्वाधारच्या पदाधिकारी व कार्यालयीन सहकारी यांनी परस्परांशी संपर्क साधून इमेल द्वारे तत्परतेने पाठविले.

अध्यक्ष श्रीमती लता कारखानीस यांनी दत्तक पालक देणगीदारांशी संपर्क साधून त्यांना देणगी चेकद्वारे न देता स्वधारच्या खात्यात जमा करण्याची विनंती करावी असे सुचविले. त्याप्रमाणे मुग्धा नाटलेकर, सुषमा शिर्के व रोहिणी कुलकर्णी यांनी सर्व देणगीदारांशी संपर्क साधून देणगीदारांना तशी विनंती केली. स्वाधारच्या या आवाहनाला देणगीदारांनी उत्तम प्रतिसाद दिला व अनेक देणगीदारांची रक्कम बँकेत जमा झालेली आहे.

जायंट ग्रुपचे श्री. अजित शेठ दरवर्षी दत्तक पालक उपक्रमातील लाभार्थी विद्यार्थिनींना रेनकोट, स्कूल बॅग, पाण्याची बाटली, टिफिन बॉक्स, पेन-पेन्सिल इ. शैक्षणिक साहित्य देणगी रूपात देतात. यावर्षीही त्यांनी या विद्यार्थिनींसाठी हे साहित्य देण्याची इच्छा व्यक्त केली होती. परंतु कोविड मुळे व शाळा अद्याप सुरू झाल्या नसल्यामुळे साहित्य वाटपाचे कार्यक्रम करणे आता शक्य नसल्याचे अध्यक्ष लता कारखानीस यांनी सांगितले. परिस्थिती सामान्य झाल्यावर व शाळा सुरू झाल्यावर या कार्यक्रमाचा विचार करता येईल. त्यावेळी स्वाधार श्री. शेठ यांच्याशी निश्चितपणे संपर्क करेल असेही त्यांनी सांगितले.

समुपदेशनाप्रमाणेच स्वाधारच्या कार्यकर्त्यांचे प्रबोधनात्मक कार्यक्रमही ऑनलाईन पध्दतीने चालू राहिले. या काळात स्वाधार कार्यकर्त्यांच्या चर्चा, शिबिरे, वेबिनार आयोजित केले. मा. मृणाल गोरे यांचा स्मृतीदिन सभा आणि मा. प्रा. पुष्पा भावे यांना आदरांजली सभा स्वाधार आणि केशव गोरे स्मारक ट्रस्ट यांनी संयुक्त विद्यमाने ऑनलाईन पध्दतीने आयोजित केल्या.

**पूर्णवेळ कार्यकर्त्यांना आर्थिक मदतीचा हात**

महाराष्टातील तळागाळातल्या लोकांच्या प्रश्नांवर काम करणारे अनेक पूर्णवेळ कार्यकर्ते आहेत. या पैकी अनेक कार्यकर्ते व त्यांच्या कुटुंबाचे आर्थिक आधार कमकुवत आहेत. लॉकडाऊनच्या काळात हे आधार अधिक कमकुवत झाले. अशा परिस्थितीतही या कार्यकर्त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले होते. या कार्यकर्त्यांनी दरमहा रु. ५०००/- द्यावेत या उद्देशाने स्वराज अभियान, डॉ. आंबेडकर शेती विकास व संशोधन संस्था आणि सेवाग्राम कलेक्टिव्ह या तीन संस्थांनी ७५ कार्यकर्ते चिन्हित करुन लोकांना आर्थिक मदतीचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देण्याचा निर्णय घेऊन स्वाधारच्या अध्यक्ष लता कारखानीस यांनी स्वाधारच्या सल्लागार श्रीमती ललिता भावे, ज्या सध्या अमेरिकेत वास्तव्यास आहेत. यांच्याशी संपर्क साधला. श्रीमती भावे यांनी महाराष्ट्र फाऊन्डेशनचे माजी अध्यक्ष श्री. सुनील देशमुख यांच्याशी संपर्क साधला. त्यांना सोशल मिडिया द्वारे या संस्थांची व या उपक्रमाची माहिती उपलब्ध करुन दिली. श्रीमती भावे व श्रीमती कारखानीस यांनी केलेल्या या संपर्कातून आणि पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र फाऊन्डेशन या संस्थे तर्फे आणि ७२ वैयक्तिक देणगीदारांनी मिळून रु. १४,२५,०००/- मदत या उपक्रमाला मिळवून दिली.

# स्वाधारचे उपक्रम

## कौटुंबिक सल्ला केंद्र -

कौटुंबिक सल्ला केंद्र हा स्वाधारचा मुख्य उपक्रम आहे. समाजातील सर्व जातीधर्माच्या आणि सर्व स्तरातील महिला आपल्या समस्या घेऊन स्वाधार मध्ये येतात. कौटुंबिक सल्ला म्हणजे केवळ काहीतरी तडजोड करुन कुटुंबियांनी एका घरात रहाणे इतका सिमित अर्थ स्वाधारला अभिप्रेत नाही. तर कुटुंबातील सर्वांना समस्येचे मूळ समजावून सांगून सर्वांना सन्मानाने एकत्र रहाता येईल असा मार्ग सुचविणे हे कुटुंब सल्ला केंद्राचे उद्दिष्ट आहे.

समस्याग्रस्त महिलेचे लेखी निवेदन घेणे, तिचे आणि समोरच्या व्यक्तीचे म्हणणे स्वतंत्रपणे ऐकून घेणे. दोघांची एकत्र बैठक घेणे, दोघांना समुपदेशन करणे, गृहभेट करणे, आवश्यक असेल तिथे दोन्ही बाजूकडील नातेवाईकांबरोबर बैठक घेणे, त्यांनाही समुपदेशन करणे आणि यातून सर्वमान्य आणि सन्मान्य तोडगा सुचविणे जेणेकरुन कुटुंबातील अन्याय दूर होईल आणि शक्यतो कुटुंब तुटणार नाही - ही स्वाधारच्या कौटुंबिक सल्ला केंद्राच्या कामाची पद्धत आहे. समुपदेशनाचे हे काम पूर्णपणे विनामुल्य केले जाते.

यावर्षी गोरेगाव केंद्र व चुनाभट्टी शाखेत समुपदेशनाचे काम चालले यावर्षी एकूण १६६ स्त्रिया स्वाधारकडे त्यांच्या समस्या घेऊन आल्या यापैकी गोरेगाव येथे १५० व चुनाभट्टी येथे १६ स्त्रिया आल्या.

## स्वाधार मध्ये समस्या घेऊन येणाऱ्या महिलांच्या सामाजिक परिस्थितीची वर्गवारी

| **धर्म** | **गोरेगाव** | **चुनाभट्टी** |
|---|---|---|
| हिंदू | ७० | ११ |
| मुस्लिम | २५ | - |
| ख्रिश्चन | ०५ | ०१ |
| बौद्ध | ३७ | ०४ |
| आदिवासी | - | - |
| अन्य | १३ | - |
| **एकूण** | **१५०** | **१६** |

| **वयोगट** | | |
|---|---|---|
| १५ पेक्षा कमी | -- | -- |
| १५ ते २५ | २५ | -- |
| २६ ते ५० | ९५ | १४ |
| ५१ ते ५० | २३ | ०१ |
| ७१ पेक्षा जास्त | ०७ | ०१ |
| **एकूण** | **१५०** | **१६** |

| **शिक्षण** | | |
|---|---|---|
| अशिक्षित | १६ | - |
| प्राथमिक शिक्षण | २७ | ०१ |
| माध्यमिक शिक्षण | ४० | ११ |
| उच्च माध्यमिक | ३५ | ०१ |
| पदवीधर | २५ | ०२ |
| उच्चशिक्षित | ०७ | ०१ |
| व्यावसायिक शिक्षण | - | - |
| **एकूण** | **१५०** | **१६** |

| **आर्थिक परिस्थिती** | | |
|---|---|---|
| स्वावलंबी | ५२ | ०४ |
| थोड्या प्रमाणात स्वावलंबी | ५८ | ०४ |
| परावलंबी | ४० | ०८ |
| **एकूण** | **१५०** | **१६** |

## स्वाधार मध्ये समस्या घेऊन येणाऱ्या महिलांच्या समस्यांची वर्गवारी

| नं. | समस्येचे स्वरुप | गोरेगाव | चुनाभट्टी |
|---|---|---|---|
| १) | स्त्रीचा सासरी होणारा शारीरिक/मानसिक छळ | १५० | १५ |
| २) | स्त्रीला नवऱ्याने सोडून दिले | ११ | ०३ |
| ३) | संशय, वाईट वागणूक | ३० | ०३ |
| ४) | नवऱ्याचे विवाहबाह्य संबंध/दुसरे लग्न | २३ | ०२ |
| ५) | नवरा व्यसनी असणे | ३८ | ०२ |
| ६) | हुंडाबळी/हुंड्याची मागणी | - | - |
| ७) | विवाहपूर्व मातृत्व | - | - |
| ८) | नोकरी / आर्थिक मदतीची गरज | - | - |
| ९) | मालमत्तेसंबंधी समस्या | १७ | ०१ |
| १०) | स्वतःची/मुलांची राहण्याची सोय | - | - |
| ११) | लग्नासाठी मदत / विवाहपूर्व मार्गदर्शन | ०५ | ०१ |
| **१२)** | **अन्य --** | | |
| | १) स्वतःच्या मुलांकडून / सुनेकडून त्रास | १६ | ०३ |
| | २) पैशाची मागणी | ०२ | - |
| | ३) स्वभाव दोष | ३५ | - |
| | ४) मुल न होणे / मुली झाल्या म्हणून | ०२ | - |
| | ५) उपासमार करणे | १३ | ०१ |
| | ६) कुटुंबातील नातलगाविरुध्द तक्रार | ०३ | ०३ |
| | ७) नवरा दुर्लभ करतो | २२ | ०४ |
| | ८) नवरा चरितार्थास पैसे देत नाही | ३० | ०५ |
| | ९) नवरा मानसिक रुग्ण | - | - |
| | १०) मुलांची आबाळ | २४ | ०१ |
| | ११) घरकामासाठी पिळवणूक | १० | ०१ |
| | १२) आरोग्याविषयी | - | - |
| | १३) लैंगिक समस्या | ०५ | - |

## स्वाधार मध्ये समस्या घेऊन येणाऱ्या महिलांच्या समस्यांची वर्गवारी

| नं. | समस्येचे स्वरुप | गोरेगाव | चुनाभट्टी |
|---|---|---|---|
| | १४) लग्न मोडले | ०१ | ०१ |
| | १५) नवरा बेपत्ता | - | - |
| | १६) संसारात माहेरच्याकडून हस्तक्षेप | १७ | - |
| | १७) संसारात सासरच्याकडून हस्तक्षेप | २१ | ०२ |
| | १८) अन्य - जावेविरुध्द / जावयाविरुध्द | १३ | - |
| | **समस्या सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न** | | |
| १) | स्त्रियांच्या बाबतीत समझोता झाला | ८४ | ०२ |
| २) | समुपदेशन चालू आहे | ६६ | ०२ |
| ३) | कायदेविषयक मदत | | |
| | अ) घटस्फोटासाठी | ४० | - |
| | आ) स्त्रीधन / सामान मिळवून दिले | २३ | - |
| | इ) मुलांचा ताबा मिळवून दिला | ०८ | - |
| | उ) मालमत्ते समस्यांबाबत | ०८ | - |
| ४) | पोलीसांची मदत मिळवून दिली | २७ | - |
| ५) | वैद्यकीय मदत मिळवून दिली | - | - |
| ६) | निवास विषयक सोय केली | - | - |
| ७) | दुसऱ्या संस्थेत मदतीसाठी पाठवले | - | - |
| ८) | नोकरी/आर्थिक मदत केली | - | - |
| ९) | प्रतिसादा अभावी केस बंद केली | ०१ | - |
| १०) | **इतर** | | |
| | अ) बाहेरुन वकीलाची मदत घेतली | - | ०१ |
| | आ) कुटुंबाकडून समझोत्याचे प्रयत्न | १६ | - |
| | इ) कायदेविषयक सल्ला | - | ०३ |
| | ई) समस्याग्रस्त महिलेला पुढे कारवाई करण्याची इच्छा नसल्याने केस बंद केली. | ०२ | ०१ |

## विशेष सल्लागार समिती

महिलांच्या समस्या निवारणाच्या कामात काही वेळा वकीलांच्या व पोलिसांच्या मदतीचीही गरज भासते. काहीवेळा वैद्यकीय व मानसोपचाराची गरज भासते. तेव्हा ही मदत स्वाधारकडून उपलब्ध करुन दिली जाते. संस्थेतील ज्येष्ठ कार्यकर्त्याचीही याकामी मदत होते. यासाठी या क्षेत्रातील तज्ञाची आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची एक विशेष सल्लागार उपसमिती कार्यरत असते. आवश्यकता भासल्यास ही समिती महिलेची समस्या सोडविण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करते.

**विशेष सल्लागार समितीचे सदस्य :-**

श्रीमती लता कारखानीस (अध्यक्ष, स्वाधार)
श्रीमती वसुधा नेने (उपाध्यक्ष, स्वाधार)
श्रीमती मंगला मराठे (कार्यवाह, स्वाधार)
श्रीमती संध्या लोहार (सहकार्यवाह, स्वाधार)
श्रीमती लता देसाई (खजिनदार, स्वाधार)
श्रीमती ज्योती वालझाडे (सहखजिनदार, स्वाधार)
श्रीमती ललिता भावे (सल्लागार)
रोहिणी कुलकर्णी - समुपदेशक आणि
डॉ. अंबरीश धर्माधिकारी (मानसोपचारतज्ञ)
डॉ. कुमुद दाभोळकर (स्त्री रोग तज्ञ)
श्रीमती मनाली सावंत (पोलिस महिला सहायता कक्षच्या समुपदेशक)
ॲड. शुभदा पेठे (वकील)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गोरेगाव पोलीस स्टेशन

## अंतर्गत तक्रार निवारण समितीतील सहभाग

कायद्यानुसार प्रत्येक आस्थापनामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराबाबत दाद मागण्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे बंधनकारक आहे. या समितीत सामाजिक संस्थेचा एक प्रतिनिधी असणे आवश्यक असते. स्वाधारच्या कार्यकर्त्याही अशा समित्यांच्या सदस्य आहेत. समस्या निवारणाबरोबर या आस्थापनाच्या महिला विकास कक्षाने आयोजित केलेल्या जाणीव जागृतीच्या कार्यक्रमात त्या सक्रीय सहभागी असतात.

१) घनश्यामदास सराफ कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट - मंगला मराठे
२) रुपारेल कॉलेज - रोहिणी कुलकर्णी
३) सरकारी चिकित्सा सामग्री भंडार - रोहिणी कुलकर्णी
४) अडेका इंडिया प्रा. लि. - मंगला मराठे
५) जे. एम. पटेल कॉलेज ऑफ कॉमर्स - रोहिणी कुलकर्णी
६) स्टेट बँक ऑफ इंडिया रिजनल बिजनेस ऑफिस - मंगला मराठे
७) इंडियन ऑडीट ॲन्ड अकाऊंट डिपार्टमेंट - रोहिणी कुलकर्णी

## शैक्षणिक उपक्रम

समस्या निवारणाबरोबरच स्त्रियांना सक्षम आणि स्वावलंबी बनविणे हे स्वाधारचे उदिष्ट आहे. यासाठी स्वाधार सातत्याने चालणारे विविध शैक्षणिक उपक्रम राबविते. स्त्रियांना विचाराने सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवायचे तर त्याचा पाया शालेय शिक्षणात घातला जातो. वस्तुतः शिक्षण हा प्रत्येक मुलामुलींचा अधिकार आहे. परंतु प्रतिकूल परिस्थिती पायी अनेक मुलांना शाळा सोडावी लागते त्यातही मुलींच्या गळतीचे प्रमाण आजही चिंताजनक आहे. या गळतीचे मुख्य कारण आहे आर्थिक दुर्बलता.

आर्थिकदृष्ट्या अतिदुर्बल घटकातील या मुलींवर शाळा अर्धवट सोडण्याची वेळ येऊ नये त्यांचे किमान शालान्त परिक्षेपर्यंतचे शिक्षण व्हावे या दृष्टीने स्वाधार लोकसहभागातून या मुलींना शैक्षणिक मदत देणारे उपक्रम राबविते.

या उपक्रमातील लाभार्थी मुलींची निवड त्यांच्या शाळांशी संपर्क साधून, गृहभेट देऊन सर्वेक्षण करुन केली जाते. लाभार्थी विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य, फी, गणवेश, वह्या, पुस्तके इ. साहित्य पुरविले जाते. यासाठी समाजातील संवेदनशील व्यक्ति तर काही व्यक्ती व संस्था शैक्षणिक साहित्य वस्तुरुप देणगी म्हणून देतात.

या मुलींना केवळ आर्थिक मदत देऊन आम्ही थांबत नाही तर त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने व्याख्याने, शिबीरे, सहली आयोजित करतो. मुलींची वैद्यकीय तपासणी करुन आवश्यक असल्यास वैद्यकीय मदत उपलब्ध करतो.

शैक्षणिक मदत देण्यासाठी स्वाधार सातत्याने तीन उपक्रम राबविते.

१) "**दत्तक पालक उपक्रम**" - आर्थिक दृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना शालेय शिक्षणासाठी लोकसहभागातून मदत देणारा.

२) "**बालरंग**" - स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिलांच्या मुलांच्या शिक्षणासाठी मदत देणारा उपक्रम.

३) "**शिक्षण सहाय्य**" - उच्च व व्यावसायिक शिक्षणासाठी मदत देणारा हे उपक्रम गोरेगाव केंद्र, चेंबूर शाखा व चुनाभट्टी शाखा राबवितात.

# स्वाधारच्या गोरेगाव केंद्राचे उपक्रम

## दत्तक पालक उपक्रम

गोरेगाव केंद्राच्या दत्तक पालक उपक्रमात यावर्षी १५० लाभार्थी म्हणून सहभागी करुन घेतल्या. सर्वेक्षणानुसार या मुलींची कौटुंबिक परिस्थिती पुढीलप्रमाणे आढळली.

| | | |
|---|---|---|
| १) | अनाथ, नातेवाईकांसोबत राहते –<br>(हे कुटुंब आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे) | १७ |
| २) | एक पालकत्व – | ३० |
| ३) | आर्थिकदृष्ट्या अतिदुर्बल कुटुंबातील आहेत – | १०३ |

**दत्तक पालक उपक्रमातील लाभार्थी मुली खालील शाळांच्या विद्यांर्थीनी आहेत.**

| | | |
|---|---|---|
| १) | मुराररराव राणे हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगाव | ५८ |
| २) | अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव | ३६ |
| ३) | सन्मित्र मंडळ विद्यामंदिर, गोरेगाव | ५४ |
| ४) | निवारा विद्यालय, गोरेगाव | ०१ |
| ५) | आदर्श विद्यालय, गोरेगाव | ०१ |
| | एकूण | १५० |

कोविड १९ च्या साथीमुळे लागू झालेल्या लॉकडाऊन मुळे यावर्षी शालेय विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे दरवर्षी प्रमाणे या वर्षी आम्ही दत्तक पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांचे निकाल आहावालात देऊ शकत नाही. तसेच पालकांनाही पाठवू शकलो नाही त्याबद्दल क्षमस्व.

**मार्च, २०२० मध्ये झालेल्या शालान्त परीक्षेस बसलेल्या मुलींचा निकाल १००% लागला.**

सर्व यशस्वी मुलींचे मन:पूर्वक अभिनंदन !

**यापैकी ज्या विद्यार्थिनींचे निकाल हाती आले त्यापैकी विशेष यश मिळविणाऱ्या विद्यार्थिनी**

**१) सेजल घोले ९३.२०%** **२) प्राची काळे ८५%**

**३) मानसी खरात ८२.६०%** **४) मयुरी साळस्कर ८०.८०%**

# बालरंग -

स्वाधारकडे येणाऱ्या समस्याग्रस्त महिलांच्या आर्थिक दुर्बलतेमुळे त्यांच्या मुलांवर शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ नये म्हणून आम्ही बालरंग उपक्रमाद्वारे या मुलांना शैक्षणिक मदत करतो. दत्तक पालक योजनेतील विद्यार्थिनींसाठी व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने शिबीरे आयोजित करतो. आयोजित केलेल्या सर्व शिबीरे, व्याख्याने इ. मध्ये बालरंग उपक्रमातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनाही सहभागी करुन घेतले जाते. यावर्षी या उपक्रमातील लाभार्थी मुलामुलींची संख्या ५० आहे.

**मार्च, २०२० मध्ये झालेल्या शालान्त परिक्षेस बालरंग उपक्रमातील ७ विद्यार्थी बसले. ते सर्व उत्तीर्ण झाले.**

**१) नेहा शिवगण - ९०%  २) नयन वायदंडे - ८५%  ३) नेहा वायदंडे - ८४%**

## कार्यकर्त्यांची साप्ताहिक बैठक -

दर बुधवारी स्वाधारच्या गोरेगाव केंद्राच्या कार्यकर्त्यांची साप्ताहिक बैठक स्वाधारच्या गोरेगाव कार्यालयात होते. या बैठकीत महिलांसंबंधीचे प्रश्न, चालू सामाजिक घटना, वर्तमान पत्रात प्रसिद्ध झालेल्या लेखांचे वाचन व त्यावर चर्चा होते आणि कार्यकर्त्यांशी चर्चा करुन आगामी कार्यक्रम ठरविले जातात व त्यांची आखणी केली जाते.

# गोरेगाव केंद्राने आयोजित केलेले कार्यक्रम

## दत्तक पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेले कार्यक्रमः-

### १) उन्हाळी सुट्टीतील शिबीर (गंमत जंमत शिबीर)- १३, १४ एप्रिल, २०१९

द. पा. यो. व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांचे उन्हाळी सुट्टीतील एक दिवसाचे गंमत जंमत शिबीर आयोजित केले. शिबीरासाठी सामाजिक कार्यकर्ते **श्री. राजेंद्र बहाळकर** यांना आमंत्रित केले होते. श्री. बहाळकर यांनी "**खेळातून अभ्यासाचे तंत्र**" हे सूत्र धरून मुलांचे निरीक्षण व कल्पनाशक्ती यांना वाव देणारे खेळ घेतले. छाया चणा शॉप आणि श्रीम. ऋजुता वाईरकर यांनी मुलांना अल्पोपहार दिला.

### २) शैक्षणिक साहित्य वाटप - ११/०६/२०१९

दरवर्षीप्रमाणे यावर्षी ११ जून, २०१९ रोजी पू. साने गुरूजींच्या स्मृतीदिनी दत्तक पालक योजना व बालरंग उपक्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. दत्तक पालक योजनेतील १५० विद्यार्थिंनी व बालरंग उपक्रमातील ५० विद्यार्थी अशा एकूण २०० या विद्यार्थ्यांना ही मदत दिली.

या विद्यार्थ्यांना त्यांच्या इयत्तेनुसार वह्या, गणवेश, काही अति गरजू विद्यार्थ्यांना पावसाळी बूट, छत्र्या इ. साहित्याचे वाटप केले. दरवर्षीप्रमाणे या वर्षीही साहित्य वाटपाज जायंट ग्रुपचे श्री. अजित शेठ आणि त्यांचे सहकारी यांची मोलाची मदत झाली. त्यांनी मुलांना दप्तर, कंपासपेट्या, पेन, रेनकोट इ. साहित्य देणगी म्हणून दिले व अल्पोपहारही दिला.

### ३) पालक पाल्य भेट - २५/०८/२०१९

दत्तक पालक उपक्रमातील लाभार्थी विद्यार्थिनी व देणगीदार पालक यांचा परस्परांशी परिचय करून देणारा हा कार्यक्रम होता. या कार्यक्रमात मार्च २०१९ मध्ये झालेल्या शालांत परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीचा कौतुक समारंभ आयोजित केला. या विद्यार्थिनींना उपस्थित देणगीदारांच्या हस्ते भेटवस्तू देऊन त्यांचे कौतुक केले. यावेळी विद्यार्थिनींनी त्यांचे मनोगत व्यक्त केले.

### ४) कला शिबीर - २२/१०/२०१९

दत्तक पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थी विद्यार्थिनीचे दिवाळी सुट्टीतील एक दिवसीय कला शिबीर आयोजित केले. शिबिराच्या पहिल्या सत्रात श्रीमती रोहिणी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना आकाश कंदील व भेटकार्ड बनविण्याचे प्रशिक्षण दिले.

दुसऱ्या सत्रात सुप्रसिध्द दिग्दर्शिका मीना नाईक यांच्या लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण करणाऱ्या "POSCO" कायद्याची, त्याच्या अंमलबजावणीच्या पध्दतीची व उपयुक्ततेची कथारूपाने माहिती देणा-या "**अभया**" या नाटकाचा प्रयोग आयोजित केला. प्रयोगानंतर श्रीमती मीना नाईक यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी संवादही साधला.

## ५) जाणीव जागृती शिबीर - २१/०२/२०२०

२१/०२/२०२० रोजी दत्तक पालक उपक्रम व बालरंग उपक्रमातील विद्यार्थी विद्यार्थिनीचे एकदिवसीय शिबीर आयोजित केले.

शिबिराच्या पहिल्या सत्रात मानसोपचार तज्ञ **डॉ. अंबरीश धर्माधिकारी** यांचे
**सामाजिक माध्यमांचा व्यक्तिमत्वावर होणारा परिणाम** यावर व्याख्यान झाले. डॉ. धर्माधिकारी यांनी मुलांना सामाजिक माध्यमांमधील भ्रामकता आणि त्याचे दुष्परिणाम तसेच या माध्यमांचा योग्य पध्दतीने वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. त्याच बरोबर समाजात लिंगसमभाव रूजविण्यासाठी प्रत्येक मुलामुलीने कसे जागरूक असावे याबद्दलही त्यांनी मुलांना मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात **ॲड. संजय वाघमारे** यांचे "चांगला स्पर्श, वाईट स्पर्श" यावर व्याख्यान झाले. व्याख्यानात ॲड. वाघमारे यांनी **चांगला स्पर्श, वाईट स्पर्श** कसा ओळखावा, मुलांवर होणारे लैंगिक अत्याचाराबाबत पालकांनी कसे जागरूक राहावे, **पोक्सो कायदा व त्याचा वापर कसा करावा** याबद्दल उपस्थितांशी सोप्या भाषेत संवाद साधला. या संवादात मुलामुलींबरोबर त्यांचे पालखी सहभागी झाले होते.

# सर्वसाधारण कार्यक्रम

## १) कार्यकर्त्या स्नेहसंमेलन -

१ जून रोजी स्वाधारचे गोरेगाव केंद्र आणि चेंबूर, मुलुंड व चुनाभट्टी तिन्ही शाखामधील ज्येष्ठ व नवोदित कार्यकर्त्यांचे स्नेहसंमेलन आयोजित केले. संमेलनात स्वाधारच्या सल्लागार ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती ललिता भावे यांनी स्वाधारची पार्श्वभूमी व वैचारिक बैठक सांगितली. श्रीमती ज्योती केळकर यांनी आजच्या परिस्थितीत स्वाधारची भूमिका मांडली. दुसऱ्या सत्रात प्रत्येक सहभागीने स्वाधारच्या पुढच्या वाटचालीविषयी त्यांचे दृष्टीकोन, सूचना सांगितल्या व काही नवीन कार्यक्रम सुचविले. भविष्यात कार्यक्रम करण्याच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त सूचना या कार्यकर्त्यांकडून आल्या. संमेलनात ३२ कार्यकर्त्या सहभागी झाल्या.

## २) सिटी कोअर ग्रुप - २४/८/२०१९

सिटी कोअर ग्रुपची मासिक कार्यशाळा २४/८/२०१९ रोजी स्वाधारने केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या सभागृहात आयोजित केली. या कार्यशाळेत **ॲड. शुभदा पेठे** यांचे कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्यावर व्याख्यान झाले. स्वाधारच्या समुपदेशक श्रीमती रोहिणी कुलकर्णी यांनी या कायद्याअंतर्गत संस्थात्मक कारवाईच्या पध्दतीची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात **शीतल देवस्थळी आणि आरती चंद्रशेखर** यांनी महिला सहाय्यता कक्षाच्या कार्यपध्दतीची माहिती दृकश्राव्य माध्यमाद्वारे दिली.

## ३) सत्तेचा खेळ आणि जनजीवन - २३/११/२०१९

महाराष्ट्रात लागू झालेली राष्ट्रपती राजवट आणि सत्तेसाठी चालू असलेले राजकारण यांच्या पार्श्वभूमीवर **ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी** यांचे व्याख्यान आयोजित केले. कार्यक्रमात सुरवातीला काही युवा कार्यकर्त्यांनी त्यांची मते मांडली. त्यानंतर प्रतिमा जोशी यांनी सत्ता स्थापनेतील राजकारणाचे विश्लेषण केले आणि उपस्थितांशी संवाद साधला.

## ४) सेंद्रिय आहार व आरोग्य - ०७/१२/२०१९

महाराष्ट्र शासन सन्मानित **सेंद्रीय कृषीभूषण वसुधा सरदार** यांचे "**सेंद्रिय आहार व आरोग्य**" या विषयावर व्याख्यान झाले. व्याख्यानात श्रीमती सरदार यांनी सेंद्रिय उत्पादनाचे आरोग्याच्या दृष्टीने महत्व सांगितले. तसेच रासायनिक खतांमुळे जमिनीची आणि पर्यावरणाची कशी हानी होते हे दृकश्राव्य माध्यमातून समजावून दिले. वसुधा सरदार यांच्या आग्रहाचा आदर राखून

स्वाधारने या कार्यक्रमात स्वाधार सेंद्रिय सेतु गट स्थापन केला. या गटात समविचारी अन्य व्यक्तिहीजोडल्या गेल्या आहेत. दर महिन्याच्या चौथ्या शनिवारी या गटातील सदस्यांना सेंद्रिय धान्य, भाजीपाला आणि फळे मिळतात. लॉकडाऊनच्या काळातही ह्यात सातत्य राहिले आहे. मागणी नोंदवणे आणि पैसे देणे हे सर्व व्यवहार ऑनलाईन होतात.

## ५) सावित्रीबाई फुले व्याख्यान - ०३/०१/२०२०

दरवर्षी स्वाधार आणि केशव गोरे स्मारक ट्रस्ट संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या जयंती दिनी चालू सामाजिक विषयावर व्याख्यान आयोजित करतात.

यावर्षी महिलांवरील "**अत्याचारांना आळा घालण्यासाठी - समाजाची, माध्यमांची, कायद्याची भूमिका**" यावर खुल्या चर्चेचा कार्यक्रम आयोजित केला. **श्रीमती मंगला मराठे** यांनी विषयाची प्राथमिक मांडणी केली. त्यानंतर उपस्थितांमध्ये चर्चा झाली. चर्चेत माध्यमांमध्ये दाखविल्या जाणाऱ्या अतिरंजक आणि भडक चित्रणाचे भान ठेवायला हवे. पालकांनी मुलांशी याबाबत बोलले पाहिजे. कायद्याबाबत जनजागृती व्हायला हवी. यासाठी सर्व वयोगटाच्या स्त्रीपुरूषांसाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. अशी मते सर्वांनीच व्यक्त केली.

## ६) आंतरराष्ट्रीय महिला दिन - ०७/०३/२०२०

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन. त्यानिमित्त ७ मार्च रोजी

"**संवाद महिलांचा- कुटुंबाशी, समाजाशी**" या विषयावर खुल्या संवादाचा कार्यक्रम आयोजित केला. सामाजिक कार्यकर्त्या व लेखिका **श्रीमती सरिता आवाड** यांनी उपस्थितांशी या विषयावर संवाद साधला. त्यांनी नातेसंबंधांमध्ये आणि सामाजिक वातावरण निकोप राखण्यासाठी परस्पर संवादाचे महत्व सांगितले. तसेच कुठल्याही व्यक्तीला पारंपरिक चौकटीने न मापता तिच्या आहे त्या व्यक्तिमत्वासह तिला स्वीकारून तिच्याशी संवाद ठेवण्याने समाजात समभाव रूजेल असेही त्या म्हणाल्या.

## अन्य संस्थांनी केलेल्या कार्यक्रमातील सहभाग-

### १) आम्ही मुंबईकर, जागृत मुंबईकर - ०१/०४/२०१९

मुंबई पोलीस दलाच्या "आम्ही मुंबईकर, जागृत मुंबईकर" या उपक्रमांतर्गत गोरेगाव पोलिस स्टेशन तर्फे जागृततेबाबत नागरिकांचे प्रबोधन करणारे व्याख्यान आयोजित केले होते. या बॉम्ब सदृश संशयास्पद वस्तू, सायबर गुन्हे आणि सर्वसाधारण गुन्हे याबाबतीत नागरिकांनी कोणत्या खबरदारी घेणे आवश्यक आहे आणि याबाबतीत नागरिकांची कर्तव्ये पोलीस अधिका-यांनी सांगितली.

या कार्यक्रमाला स्वाधार संस्थेच्या कार्यवाह मंगला मराठे, सहकार्यवाह संध्या लोहार, सहखजिनदार ज्योती वालझाडे आणि सुषमा शिर्के हजर होत्या. स्वाधार संस्थेचा चांगल्या कामाबद्दल पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. स्वाधारच्या कार्यवाह श्रीमती मराठे यांनी हा गौरव स्वीकारला. या वेळी स्वाधारमध्ये येणाऱ्या समस्याग्रस्त महिलांना जेव्हा पोलिसांच्या मदतीची गरज भासते तेव्हा गोरेगाव पोलिस स्टेशनचे सर्व अधिकारी व कर्मचारी संस्थेला नेहमीच चांगले सहकार्य करतात असे विशेषत्वाने सांगितले आणि या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

### "२१ व्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने"- ३१/०७/२०१९

घन: श्यामदास सराफ कॉलेज ऑफ आर्टस अँड कॉमर्सच्या महिला विकास विभागाने दि. ३१ जुलै २०१९ रोजी "**२१ व्या शतकातील स्त्रियांसमोरील आव्हाने**" या विषयावर एक राज्यस्तरीय एक दिवसीय सेमिनार आयोजित केला. सेमिनार मध्ये **सराफ महाविद्यालय व अन्य** महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मिळून २०० जण सहभागी झाले.

पहिल्या सत्रात "महिलांवरील अत्याचार- कारणे व उपाय" या विषयावर परिसंवाद झाला. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती विजया रहाटकर यांनी दृकश्राव्य माध्यमातून उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या महिला विकास कक्षाच्या अध्यक्ष **श्रीमती गीता चढ्ढा** यांचे व्याख्यान झाले. त्यांनी लिंगाधारित विषमता, त्याचे सामाजिक परिणाम यांचे विश्लेषण केले.

**श्रीमती मंगला मराठे** यांनी महिलांची चळवळ ही पुरूषांविरूध्द नाही तर लिंगाधारित वर्चस्व गाजविणा-या पुरूषीप्रवृत्ती विरोधातला हा लढा आहे. अत्याचाराची कारणे सांगून ते थांबविण्यासाठी प्रबोधनाची आणि त्यात तरूणांच्या सहभागाची गरज त्यांनी अधोरेखित केली. प्रत्येक मुला मुलीला जन्मजात चित्तवृत्तींसह वाढण्याची संधी मिळाली पाहिजे. पांरपरिक चौकटीत बांधले जाऊ नये. त्यामुळे सामाजिक वातावरण अधिक मोकळे निकोप राहील. असेही त्यांना सांगितले.

**ॲड पूजा कुटे** यांनी कायदे आणि त्यांचा वापर सांगितला. अत्याचारांबाबत पोलीसांची मदत कशी घ्यावी हे ही त्यांनी सांगितले.

**लेखिका अरूणा जोगळेकर** यांनी स्त्रीच्या क्षमता, तसेच स्त्री प्रश्नाबाबत माध्यमांच्या क्षमता आणि मर्यादा विषद केल्या.

दुसऱ्या सत्रात सहभागी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी यांनी शोधनिबंध सादर केले. या निबंधांमध्ये मुंबईच्या लोकल प्रवासापासून ते जागतिक पर्यावरणातील स्त्रियांच्या सहभागापर्यंत विविध सामाजिक व कायदेविषयक विषय हाती घेतलेले दिसले.

शेवटच्या सत्रात सर्व सहभागींना मंगला मराठे व ज्येष्ठ प्राध्यापकांच्या हस्ते प्रशस्ती पत्रके देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## १) सिटी कोअर ग्रुप

सिटी कोअर ग्रुप हे मुंबईतील महिला आणि मुलांसाठी काम करणा-या संस्थांचे संघटन आहे. हा ग्रुप विशेषत्वाने महिला व मुलांवर होणा-या अत्याचारांबाबत आणि महिलांच्या समस्यांबाबत पोलीसांमध्ये जाणीवजागृती करण्याचे काम करतो. स्वाधार या ग्रुपमध्ये सहभागी आहे. या ग्रुप तर्फे दर महिन्याला कायदेविषयक कार्यशाळा आयोजित केली जाते. पोलिस अधिका-यांशी संवाद साधून सहकार्य वाढविण्यासाठी प्रयत्न केले जातात. स्वाधार या कार्यक्रमात सातत्याने सक्रीय सहभागी होते. श्रीमती मंगला मराठे, श्रीमती रोहिणी कुलकर्णी लता देसाई स्वाधारच्या प्रतिनिधी म्हणून सिटी कोअर ग्रुप्रच्या कार्यक्रमात सहभागी होतात.

## लिंगसमभाव कार्यशाळा - ०५/०३/२०२०

इंडियन ऑडीट ॲन्ड अकाऊंट डिपार्टमेंट तर्फे **स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार** या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. श्रीमती रोहिणी कुलकर्णी आणि श्रीमती मंगला मराठे यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात श्रीमती रोहिणी कुलकर्णी यांनी अत्याचाराची कायद्याने केलेली व्याख्या, आणि **अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या कार्यपध्दतीची माहिती दिली.** श्रीमती कुलकर्णी व श्रीमती मराठे यांनी या बाबतचे त्यांचे अनुभवही सांगितले. दुस-या सत्रात श्रीमती मराठे यांनी समाजात रूजवलेल्या **लिंगभेदाची कारणे, परिणाम आणि उपाय** यावर उपस्थितांशी संवाद साधला. आपल्या कळत नकळत आपण लिंगभेदाला कसे खतपाणी घालतो आणि लिंगसमभाव रूजविण्यासाठी आपल्याला प्रत्येकाला दैनंदिन जीवनात, आपल्या वागण्यात व बोलण्यात जागृत राहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

# मृणाल गोरे दालन

केशव गोरे स्मारक ट्रस्ट, मा. मृणाल गोरे यांच्या स्मृत्यर्थ त्यांच्या कार्याची माहिती देणारे दालन उभारत आहे. या दालनासाठी स्वाधारच्या कार्यकर्त्यांनीही आर्थिक मदत देऊन खारीचा वाटा उचलला.

| | |
|---|---|
| १) अंजली वर्तक | २,५०,०००/- |
| २) प्रमोद लेले (रेखा लेले) | ५०,०००/- |
| ३) मालती गुप्ते | १५,०००/- |
| ४) वासंती जोगळेकर | १०,०००/- |
| ५) जयश्री भिसे | १०,०००/- |
| ६) गीता वाझ | १०,०००/- |

**रुपये ५,०००/- खालील प्रमाणे**

| | |
|---|---|
| १) रश्मी सामंत | २) ललिता भावे |
| ३) प्रभा नारायण | ४) कांचन गायकर |
| ५) उल्का दिवाडकर | ६) शुभदा आगाशे |
| ७) सुलभा नंद | ८) श्रीपाद लोटलीकर |

**रुपये २,०००/- खालील प्रमाणे**

अरविंद देवल, लता कारखानीस, लता देसाई, संध्या लोहार, माधुरी तेंडुलकर, वसुधा नेने, अरुण वालझाडे, सुषमा शिर्के, सुनंदा साळवी

**रुपये १,०००/- खालील प्रमाणे**

अरविंद सावला, कुंदा कारेकर, राजेश नवाथे, अमिता नवाथे, विमल शहापुरकर, मंगला मराठे, नवीन गाला, चंद्रकांत काळे, रोहिणी कुलकर्णी, सुशीला पारकर, लक्ष्मी चेंबूरकर, कांचन जाधव, कुंदा म्हात्रे, सुजाता खानोलकर, उषा जाधव, कमलाकर बेडेकर, अनिल कर्णिक, रजनी विचारे

**रुपये ५००/- खालील प्रमाणे**

गीता पंडित, राधा कर्णिक, सावित्री बरई, हिना मालपेकर, प्रभावती क्षिरसागर, सुधा जोशी, शुभदा कारेकर

# चेंबूर शाखेने आयोजित केलेले कार्यक्रम

**दत्तक पालक उपक्रमासाठी –**

स्वाधारची चेंबूर शाखा १९८८ सालापासून मा. इंदूताई खानोलकर यांच्या नेतृत्वाखाली चालू असलेल्या दत्तक पालक उपक्रमात यावर्षी चेंबूर, गोवंडी, मानखुर्द येथील विविध शाळांमधील इ. ५ वी ते इ. १० वी मधील एकूण २२१ विद्यार्थिनींना लाभार्थी म्हणून सहभागी करुन घेतले.

या उपक्रमांगर्तत विद्यार्थिनींना १३ जून २०१९ पासून शैक्षणिक साहित्य देण्यात आले. विद्यार्थीनींना वह्या, कंपास, रंगपेटी, चित्रकला वही, छत्री, पेन, वॉटरबॉटल इत्यादी वस्तूंचे वाटप करण्यात आले. शैक्षणिक आर्थिक मदत इ. ५ वी ते इ. ८ वी च्या विद्यार्थीनींना संगणक वर्गाच्या शुल्कासाठी व गणवेशासाठी आणि ९ वी व १० वी तील विद्यार्थीनींना पाठ्यपुस्तकासाठी आर्थिक मदत देण्यात आली.

श्री. महेश खानोलकर यांच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या प्रोत्साहन उपक्रमात गरजू विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या उच्च शिक्षणासाठी मदत उपलब्ध करुन दिली जाते. स्वाधारच्या दत्तक पालक उपक्रमातील शालांत परिक्षा पास झालेल्या विद्यार्थीनींनाही उच्च शिक्षणासाठी या उपक्रमाद्वारे मदत उपलब्ध करुन दिली जाते.

**दत्तक पालक उपक्रमातील विद्यार्थीनींसाठी आयाजित केलेले कार्यक्रम -**

**१. १० वीच्या विद्यार्थीनींचा कौतुक समारंभ – (११ जुलै २०१९)**

